| | |
|---|---|
| MHOS120012292025 | नियमित दिवाणी दावा क्र.१०८५/२०२५<br>लाला वि. सिध्दार्थ.<br>CNR No. MHOS12-001229-2025<br>निशाणी ३३ खाली. |

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा शपथेवर सरतपास**

**नावः मारुती गंगाधर कोटगिरे**

**वयः** ३४ वर्षे, व्यवसायः प्रभारी दुय्यम निबंधक भूम.

**रा.** भूम, ता. भुम, जि. धाराशिव.

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ चा सरतपास विधिज्ञ श्री. सी. बी. डंबरे यांचेमार्फत शपथेवर सुरू :–**

१. मला साक्षीसमन्स मिळाले आहे. साक्षीसमन्स मध्ये नमुद केल्याप्रमाणे मी कागदपत्रे आणली असून ती निशाणी क्र. ३४ च्या अर्जासोबत अभिलेखावर दाखल केली आहेत. दस्त क्र.१९०४/२०१९ हा दस्त भूम येथील दुय्यम निबंधक येथील कार्यालयात ०८/११/२०१९ रोजी नोंदवला आहे. सदरचा दस्त साहेबराव श्रीरंग अहिरे, लाला बाबु अहिरे, गुलाब विश्वनाथ अहिरे यांनी सतिश रतन उगले, किरण रामकिसन उगले यांचेकडून लिहून घेतला आहे. सदरचा दस्त मौजे डोकेवाडी ता. भूम येथील गट क्र. १०३/क मधील बाबतचा होता. सदरचा दस्त हा एकूण ०३ हे ६० आर क्षेत्राचा आहे. लाला यांना सतिश याने ८० आर क्षेत्र दिले आहे व किरण याने ४० आर दिले आहे. सदर दस्ताची साक्षांकित प्रत निशाणी १९ सोबत दाखल केली आहे ती आता मला दाखविण्यात आली. त्यावर सर्टीफाईड केले म्हणून तत्कालिन दुय्यम निबंधक यांची सही आहे. आमचे कार्यालयातील अभिलेखाप्रमाणे निशाणी १९ सोबतची खरेदीखताची प्रत ही खरी व बरोबर आहे. त्यास **निशाणी ३५** देण्यात येते. त्याची साक्षांकित प्रत मी निशाणी ३४ सोबत दाखल केली आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ श्री. एम. ए. सोन्ने यांच्याकडून सुरू**

२. मी दिनांक ०२/०७/२०२६ रोजी प्रभारी दुय्यम निबंधक म्हणून भूम येथे रुजू झालो. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १९०४/२०१९ चे खरेदीखत माझेसमक्ष झाले नाही. हे

म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखतावरील लिहून देणार व लिहून घेणार यांच्या सह्या माझे समक्ष केल्या  नसल्याने मला माहिती नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, सदर खरेदीखताचे बाबतीत पैशाची देवाणघेवाण माझे समक्ष झाली नाही. मला याची माहिती नाही की, सदर खरेदीखत होतेवेळी पक्षकाराने जाहीर प्रगटनाची प्रत आमचे कार्यालयात दिली होती अगर कसे. हे म्हणणे खरे आहे की, खरेदीखत माझेसमक्ष झाले नसल्याने मला याची काहीच माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देवून खोटा जबाब दिला.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

दिनांक – १०/०७/२०२६

ठिकाण – भूम.

श्रवणोत्तर स्वीकृत

PRATIBHA PRABHAKAR KHAPE

Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.07.10 15:07:21 +0530

**(श्रीमती पी.एस.जाधव)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, भूम.